Vol 4 Issue 10 July 2015

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 10 | July - 2015

# फुले शाहू–आंबेडकरी विचारधारेची प्रासंगिकता आणि चळवळी

प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड

## प्रस्तावना

प्रस्तुत शोधनिबंधात फुले–शाहू–आंबेडकरांनी वेळोवेळी चालविलेल्या चळवळींची प्रासंगिकता तपासण्याचा प्रयत्न केलेला असून त्यांनी चालविलेल्या चळवळी आजच्या चळवळींना कोणत्या प्रकारे सहाय्यक ठरू शकतात हा शोध निबंधाचा प्रस्तुत हेतू आहे. फुले–शाहू–आंबेडकरी चळवळी या आजच्या चळवळींचा मुख्य आधार आहे. आजच्या चळवळी या फुले–शाहू–आंबेडकरी विचारधारेवर अवलंबून जनहितासाठी राबविल्या जाणाऱ्या दिसून येतात. फुले–शाहू–आंबेडकरांच्या चळवळींचा मूळ हेतू आजच्या चळवळीतून दिसून येत नाही. फुले–शाहू–आंबेडकरांचे चळवळींमुळे समाजाला एकप्रकारे दिशा प्राप्त होऊन आपल्या अधिकारांप्रती जबाबदारी निर्माण झाली.

**SHORT PROFILE**

Pro. Dr. Sujata sudhir gaikwad is working in Vidhyavardhini Mahavidhyalay, Dhule

### म. ज्योतिबा फुले यांची सत्यशोधक चळवळ

जोतिरावांनी उभी केलेली सत्यशोधक चळवळ ही सामाजिक, आर्थिक व धार्मिक पुनर्रचनेची बहुजन समाजाची समाज परिवर्तनाची क्रांतीकारक चळवळ होती. बुद्धीप्रामाण्य, इहवाद, मानवतावाद व समतावाद ही या चळवळीची मुख्य सूत्रे होती. जोतिरावांनी सनातन्यांच्या अनिष्ठ रुढी, परंपरा व जुलमी धर्मकल्पना यांचे मानसिक व वैचारिक गुलामगिरीच्या जोखडातून शुद्रातिशूद्र या कनिष्ठ वर्गांना मुक्त करून त्यांना 'समानतेचा' मानवी अधिकार देण्याचे महत्वाकांक्षेने प्रेरित होऊन मानवी धर्माच्या नव्या चळवीला आरंभ करण्याचा निर्धार केला. जोतिराव हे समाज परिवर्तनाचे क्रांतिकारक 'बोले तैसा चाले' या वृत्तीचे नेते असल्याने त्यांच्या कृतीका सुसंगत व विचाराला पोषक असे तत्त्वज्ञान व सार्वजनिक व्यासपीठ निर्माण करणे 'मानवमुक्तीच्या दृष्टीने' गरजेचे होते. मानवाची सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्तता करून शोषणरहित समाजाची निर्मिती करणे हे जोतिरावांचे अंतिम ध्येय होते. शूद्रातिशूद्र यांची परिस्थिती सुधारणासाठी प्रयतनांची पराकाष्ठा केली पाहिजे. समाजपरिवर्तनाचे या महान कार्यासाठी सतीचं वाण घेतले पाहिजे व मोठ्या दृढ निश्चयाने व विचाराने मुलगामी सुधारणा केल्या पाहिजेत. शूद्रातिशूद्र यांच्यासाठी हाताच्या बोटावर मोजता येण्याएवढ्या शाळा काढून समाज परिवर्तनाचे हे कार्य पूर्ण होणार नव्हते. याची जाणीव उद्यमशील व कृतीशील जोतीरावांना झाली. अनिष्ठ रुढीपरंपरा व कालबाह्य जुलुमी धर्मकल्पना यांचे अन्यायी जोखडामुळे सर्वसामान्य अज्ञानी कनिष्ठ वर्ग या मानवी हक्कांपासून पिढ्यानपिढ्या दूर होता. हे मानवी अधिकार मिळण्यासाठी सनातनी उच्चवर्गाबरोबर संघर्ष करणे आवश्यक होते व ह्यासाठी हा कनिष्ठ वर्ग जागृत करून त्यांना समाजात एकसंघ करून मानवी अधिकार प्राप्त क-णयासाठी प्रवृत्त करणे ही काळाची गरज आहे, असा जोतीरावांचा ठाम विचार झाला व त्यासाठी एक स्वतंत्र व संघर्ष करणारे वैचारिक व्यासपीठ पाहिजे या विचाराने प्रेरित होऊन जोतीरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाची चळवळ ही या देशातील कनिष्ठ दर्जाचे कल्याणा साठी उभारलेली मानव मुक्तीची पहिली चळवळ होय. या चळवळीद्वारे जोतीरावांना धार्मिक, आर्थिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करावयाची होती. जोतिरावांच्या या चळवळीचा विचार मानवी स्वातंत्र्याकडे, मानवतेकडे व समतेकडे नेणारा विचार होता. भारतातील जुन्या अनिष्ट रुएी परंपराविरुद्ध जोतिरावांचे हे पहिले बंड होते. भारतातील अनिष्ट रुढी परंपरा व सनातन्यांच्या स्वार्थी कृत्रिम कालबाह्य अन्यायी कल्पना यांच्या गुलामगिरीच्या जोखडात शूद्रातिशूद्र हजारो वर्षे अडकले होते. माणसातील उच्चनीच भेदभाव हे ईश्वरी संकेताने व माणसाच्या पूर्वकर्माने निर्माण झालेले आहे व कनिष्ठ जातीचा जन्म फक्त उच्चवर्गीयांची सेवा करण्यासाठीच आहे, अशा प्रकारची भावना जनसामान्यांमध्ये पक्की रुजली होती. माणसाला जनावरांपेक्षाही हीन वागणूक मिळत होती. या अनिष्ट गोष्टींविरुद्ध बंड करण्याची उर्मी जोतीरावांच्या मनात निर्माण झाली. शाश्वत नैतिक सत्वाच्या आधारावर त्यांची विचारसरणी अधिष्ठित होती. मानवी कल्याणाच्या मानवी मुक्तीचा उच्चतर विचार त्यांच्या मनात निर्माण झाला होता. ते सत्यशोधक बनले होते. जोतीरावांचे इंग्रजी शिक्षण झाले होते. त्यांनी इंग्रजी ग्रंथकारांचे इंग्रजी ग्रंथ वाचले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञानवाद व मानवता या सर्व श्रेष्ठ मूल्यांची जाणीव त्यांना या वाचनातून झाली होती. इंग्रजी वामयामुळे मानवी कल्याणाचा नवविचारांची बैठक त्यांच्या ठिकाणी तयार झाली होती. या विचारांमुळेच त्यांनी भारतातील जुन्या अन्यायी समाजरचनेला आव्हान दिले होते. सत्यशोधक चळवळ ही देशातील खेड्यापाड्यांपर्यंत वाडीवस्तीपर्यंत पोहचली पहिली सार्वजनिक चळवळ होय. ही चळवळ म्हणजे शूद्रातिशूद्र व स्त्रियांना शिकवून शहाणे करून तंना ज्ञानी करून त्यांच्या मनामध्ये पिढ्यानपिढ्या वसत असलेल्या अज्ञानाची व अनिष्ठ रुएी

विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे

परंपरांची जळमटे झटकून टाकून खऱ्या माणसाचे आधुनिक संस्कृतीचे व ज्ञानाचे लोण त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी एक समाज परिवर्तनाची चळवळ होती. धार्मिक व सामाजिक जुलमशाही नष्ट करणे हे या चळवळीचे उद्दिष्ट होते. त्यांचा मुख्य लढा सनातनी धर्मसंस्थेशी होता. माणूस त्यांच्या अंगच्या गुणांनी श्रेष्ठ ठरतो. जन्माने किंवा जातीने नाही. महार सदाचारी असला तरी तो नीच आणि ब्राह्मण दुराचारी असला तरी तो श्रेष्ठ ! हा कुठला न्याय. स्वार्थी व सनातनी लोकांनी मूळच्या धर्मग्रंथात खोट्या व बनावट धर्मकथाच घुसविल्या व त्याचा पगडा कनिष्ठ जातीवर बसविला होता. या विरोधात ही चळवळ जोतीरावांनी उभारलेली होती. 24 सप्टेंबर 1873 रोजी सत्यशोधक समाज ही संस्था म. फुल्यांनी स्थापन केली. सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रात वेगाने पसरली व ती बहुजन समाजाच्या उद्धाराची चळवळ ठरली.

### *शाहू महाराजांच्या सत्यशोधक चळवळीबाबतचा दृष्टिकोन*

''सत्यशोधक समाजाचा आवाज हा हिंदुस्थानात अनेक शतके दडपून टाकलेल्या समाजाची किंकाळी होय. राजर्षी शाहू महाराजांना या सत्यशोधक समाजाचे सूत्र पकडले ते वेदोक्त प्रकरणाच्या निमित्ताने. जोतिरावांचे सामाजिक समतेचे ध्येय आणि त्यातून आम जनतेला रयतेच्या उद्धाराचा विचार राजर्षींना आकर्षित करू लागला. त्यामुळे सत्यशोधक समाजाचे पुनर्जीवन करण्याची कल्पना त्यांच्या मनात निर्मा झाली. त्याप्रमाणे 11 जानेवारी 1911 रोजी राजर्षींनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. धनगर समाजातील श्री. विठ्ठल विराजी डोणे यांची शिक्षण म्हणून नेमणूकही केली. समाजासाठी इमारत बांधण्यासाठी देणगी म्हणून जमीनही दिली. समाजाचे कार्य नेटाने सुरू करून वेदोक्त प्रकरणातील विचारक्रांतीमुळे राजर्षींनी हे पाऊल उचलले. सन 1913 च्या जुलै मध्ये सत्यशोधक शाळा स्थापन केली. ऐश्री. हरिभाऊ चव्हाण आणि श्री भास्करराव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली 'घरचा पुरोहीत' नावाचा एक मार्गदर्शक ग्रंथही प्रसिद्ध केला. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनी या शाळेत प्रवेश घेतला. या शाळेत जे विद्यार्थी, शिक्षक तयार झाले त्यांना खेडेगावात जाऊन ब्राह्मण पुरोहितांच्या जागा पटकाविल्या. जन्मसिद्ध जातिभेदाच्या पलीकडे जाऊन सर्व माणसांना वेदपठणाचा अधिकार आहे हे सांगण्यासाठी सत्यशोधक शाळेचा जन्म झाला. वैदिक परंपरेचा विचार जपणे, वाढविणे आणि जनमानसात रुजविणे हे शाळेचे ध्येय होते. संपूर्ण महाराष्ट्र हे या शाळेचे कार्यक्षेत्र होते. धार्मिक स्वातंत्र्याचे विचारविश्व निर्माण करणे हा या शाळेचा अट्टहास होता. सामाजिक समता प्रस्थापित करून परंपरागत रुढींच्या बंधनातून मानवास मुक्त करणे हा या शाळेचा मूलमंत्र होता. राजर्षींना सर्व समाजासाठी एक धार्मिक व्यासपीठ निर्माण करावयाचे होते आणि म्हणून सत्यशोधक शाळा या खऱ्या अर्थाने समाज मनात क्रांती घडवून आणणाऱ्या समाजशाळा ठरल्या. समाज परीक्षण निरीक्षण करून समाज परिवर्तन करण्याच्या कार्यामधील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून सत्यशोधक शाळा स्थापन करून राजर्षींनी महात्मा फुल्यांच्या अपुऱ्या राहिलेल्या समाज परिवर्तनाच्या कार्यास ठोस हातभार लावला. शिक्षणाच्या आधाराने सर्व समाजाची धार्मिक गुलामगिरीतून सुटका करून स्वतंत्रपणे आचार, विचार करण्याची प्रेरणा देण्याचे काम या शाळेने यशस्वीपणे केले.

डॉ. आंबेडकरांची सत्यशोधक चळवळीपासून पुढे गेली दलित चळवळ बाबा वलंगकर (दापोली) हे 'विराट विध्वस्न' हे वृत्तपत्र काढीत. त्यांनी म. फुले व दीनबंधू यांच्याशी संपक साधला होता. पण केवळ शिवाशिव संपली म्हणजे दलितोद्धार संपला काय ? यापुढे जाऊन आंबेडकरांनी सर्वांगीण व सर्वंकष चळवळीचे स्वरुप आधुनिकदृष्ट्याव लोकशाहीच्या तत्त्वांना शोभेल असे न्वयाने मांडले व संघर्षाचा अभूतपूर्व पवित्रा घेतला. विद्रोह व विग्रह या पैलूंची मोड दिली. संघर्षवादी आंबेडकर उमटून दिसू लागले. सर्व अस्पृष्यता निवारक पूर्व सूरीपेक्षा आंबेडकरांचा प्रभाव अपूर्वरित्या पडू लागला व परिणामतः पूर्वास्पृश्य खडबडून जागे झाले. नव्या दलित चळवळीला त्यांनी जन्म दिला. स्वतंत्र राजकारण करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष चालू केला. दलितांना योग्य स्थान मिळावे यासाठी महाडची चवदार तळ्याची चळवळ, काळा राम मंदिर चळवळ या चळवळी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी खऱ्या अर्थाने राबविल्या गेलेल्या चळवळी होत. म. फुले–आंबेडकर–शाहू महाराज या तिघांपुढे विविध वाटा होत्या; परंतु ते कोणत्याही उपलब्ध मार्गाने गेले नाहीत तर त्यांनी स्वतःचा स्वतंत्र व स्वावलंबी मार्ग नव्याने शोधून काढला म्हणून त्यांना नवपथ शोधणारे व त्या नवीन वाटेने इतरांना जाण्यास भाग पाडणारे न्यू पाथ फाईंडर म्हणून संबोधले जाते. फुल्यांना समजून आले होते की त्यांच्या ज्या विराट बहुजन समाजात जन्म झाला होता तो समाज निरक्षरतेच्या निद्रेत आहे महणून मागास राहिला आहे. त्याला पुढे आणण्यासाठी फुले यांनी सत्य शोधनाचा नवामार्ग दाखविला. ईश्वरदत्त व ईश्वर लिखित धर्म ग्रंथ आहेत. म्हणून ते अपरिवर्तनीय असून सर्वथा सर्वांशी प्रमाण मानलेच पाहिजे असा परंपरेने हट्ट चालू केला हेता. तर ग्रंथ मानव लिखीतच मनुष्यकृत आहेत. हा सिद्धांत फुल्यांनी मांडला व वाढविला. फुले–आंबेडकरांनी धर्मग्रंथांनी व पोथ्यापुराणातील विषमतेला पाठिंबा देणाऱ्या भागावर घाणाघाती घाव घातला. हे खण्डन अपरिहार्य होते. ज्या रुढीप्रथा होत्या व अजूनही आहेत त्या अनिष्ठ रुढी प्रथांना धर्मग्रंथांचा पाठिंबा आहे व आधार आहे. हा आधार मोडून टाकण्यस परिवर्तनाचा मार्ग मोकळा होतो. विषमता दर्शक जो भाव धार्मिक ग्रंथामध्ये आहे तो नव्या काळात लोकशाहीचा आड येतो. असे जाणून अस्पृश्यता ही मनुष्यकृत रुढींमुळे टिकून आहे. ती गेली पाहिजे. यासाठी गेल्या शतकात झालेल्या प्रबोधनात अस्पृश्यता निवारणाच्या इतिहासचा मोठा भाग आहे हे हा प्रश्न महाराष्ट्रापुरताच नव्हता तर अखिल भारतीय होता. शंभर वर्षानंतर बिनसरकारी प्रयत्नामुळे शिवाशिव, सोवळे–ओवळे, विटाळ–चंडाळ मानणाऱ्यांची फार जुनी प्रथा फुले–शाहू–आंबेडकर यांच्या अस्पृश्यताविषयक चळवळीने नष्ट झाली. आंबेडकर पूर्वकाळातही थोडीफार जागृती होत होती व त्यामुळेच दलित चळवळीचा अस्पष्ट उगमही झाला होता व ही चळवळ या तीनही थोर पुरुषांच्या कार्यामुळेच सुरू झाली होती. अनिष्ट रुढी परंपरेच्या बेडीतून मानवाला मुक्त करण्यास क्रांतीकारी ठरली.

### *निष्कर्ष*

1) फुले–शाहू–आंबेडकरी चळवळीमुळे आज अंधश्रद्धा बऱ्यापैकी नष्ट होऊन देश प्रगती पथावर जाण्यासाठी धडपडतांना दिसतो आहे.

2) चांगले जीवन जगण्यासाठी आंबेडकरी चळवळ फुल्यांची चळवळ आहे व बहुजन समाजाचे शोषण नष्ट करण्यासाठीच या चळवळीचे उद्दिष्ट आहे. याबद्दलची जागृती हळूहळू आजच्या चळवळींच्या नेतृत्वामध्ये होतांना दिसून येत आहे.

3) चळवळींना गतीमान करण्यासाठी व अंधश्रद्धेचे निर्मूलन

करण्यासाठी आपल्या देशातील श्री अठरापगड देवतांची संकल्पना आणि देवाधर्माच्या नावावर जी लुबाडणूक केली जाते ती बंद करण्याची जबाबदारी आजच्या चळवळीच्या नेतृत्वाची आहे.

4) अजूनही देवदेवतांच्या गराड्यात पूजाअर्चेत गुरफटलेल्या समाजाला सावरण्यासाठी आजच्या चळवळी कमकुवत ठरत आहेत. पोटभरु शोषण करणाऱ्या देवाधर्माच्या नावाखाली लुबाडणाऱ्यांची संख्या वाढत असल्यामुळे दैववादावर विसंबून राहिल्यामुळे आजच्या चळवळी या फुले–शाहू–आंबेडकरांच्या चळवळीपासून दुरावल्या आहेत असे वाटत आहे.

### *उपाययोजना*

1) चळवळीमध्ये अधिकाधिक सुशिक्षित लोकांचा भरणा केला गेल्यास चळवळीचे फलिते निश्चितच साध्य होते.

2) चळवळ ही तळगाळापासून खेडोपाडी राबविण्याचा प्रयतन केला गेल्यास चळवळ यशस्वी होऊ शकते.

3) चळवळीत प्रबोधनाचे उद्दिष्ट असले पाहिजे तरच या चळवळी प्रासंगिकतेनुसार यशस्वी ठरू शकतात.

### *संदर्भ*

1) डॉ. कोत्तापल्ले नागनाथ, जोतिपर्व, स्वरुप प्रकाशन, आवृत्ती पहिली, औरंगाबाद.

2) ॲड. कांडगे राम. महा. महात्मा जोतीराव फुले व्यक्ती व कार्य, प्रथमावृत्ती, 2004, राजश्री प्रकाशन, चाकण, पृ. 168–169.

3) रेगे शां. शं., भीमपर्व, सुभाष प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1191, पृ. 69.

4) प्राचार्य भगत, रा. तु. शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जाने 1999, पृ. 138–139

5) प्रा. नाईकवाडे अशोक, भारतरतन डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्ञानेश प्रकाशन, बीड, 6 डिसेंबर 1991ख पृ. 90.

6) डॉ. पानतावणे गंगाधर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती 15 जून 2009, पृ. 136–137.

7) संपा. डॉ. भोसले एस. एस., क्रांतिसुकते : राजर्षी शाहू महाराज, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, 1975, पृ. 72.

8) वाघ बाबुराव, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता, काल आणि आज, रजत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 1 मार्च 2012, पृ. 79–80.



*प्रा. डॉ. सुजाता सुधीर गायकवाड*
*विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* Directory Of Research Journal Indexing
* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com